

मा. डॉ. संजय चहांदे, (भा.प्र.से.),
विभागीय आयुक्त, नाशिक

# ग्रामस्थ दिन योजना

## संकल्पना

विकास प्रशासनाचा मुख्य व मध्यवर्ती बिंदू हा गांव आहे. मात्र गावात लोकांचे प्रश्न सुटत नाहीत ही सर्वात महत्वाची समस्या आहे. शासनाच्या योजना गावापर्यंत पोहोचत नाही हा दुसरा प्रश्न नेहमीच भेडसावत असतो. तिसरा व महत्वाचा मुद्या म्हणजे गावातील जे विविध खात्यातील कर्मचारी असतात ते योग्य पध्दतीने काम करीत नाहीत त्याचप्रमाणे गावात असणाऱ्या संस्था उदा. शाळा, अंगणवाडी, रेशनदुकान, उपकेद्र, इत्यादींची अवस्था अत्यंत वाईट असते असेही सतत म्हटले जाते.

सर्व समस्यांवर मात करणेसाठी एका विशिष्ट दिवशी गावपातळीवरील काम करणारे सर्व कर्मचारी एकत्र येवून ग्रामपंचायतीत गावकऱ्यांसमोर आपल्या कामाचा लेखाजोखा ठेवतील. त्याच्रपमाणे त्यांच्या संबंधीत सरकारी योजनांची माहिती देतील, गावातील संस्थांच्या कामाचा आढावा घेतील, ग्रामस्थांच्या तक्रारी ऐकून घेतील या उद्येशाने नाशिक महसूल विभागात जानेवारी २००७ पासून प्रायोगिक तत्वावर नाशिक विभागातील अहमदनगर, राहुरी, एरंडोल, शिरपूर, तळोदा व येवला या सहा तालुक्यातील, प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये प्रत्येक महिन्याच्या एका बुधवारी ग्रामस्थ दिन ही योजना राबविण्यांत आली.

या योजनेचे अंत्यंत चांगले परिणाम हाती आले आहेत. या उपक्रमामुळे सर्व ग्राम अधिकारी एकत्रितपणे गावात उपलब्ध झाले. त्यांनी ग्रामस्थांना त्यांचे काम, योजना समजावून सांगितल्या, ग्रामस्थांचे प्रश्न समजावून घेतले व काही प्रश्न जागेवरच सोडविले, काही प्रश्न दुसऱ्या ग्रामस्थ दिनापर्यंत सोडविले, काही प्रश्न सुटण्यासारखे नव्हते ते अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना समजावून सांगितले. त्याचप्रमाणे गावातील विविध संस्था, उदा. शाळा, रेशन दुकान इत्यादि यांना देखील कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले.

सर्व ग्राम कर्मचाऱ्यांनी एका ठराविक दिवशी पुर्वसूचना देवून तहसिल पातळीवरून नेमलेल्या ग्राम पालक अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायतीत जायचे, ग्रामस्थ, लोकप्रतिनिधि, लाभार्थी, स्वयंसेवी संस्था अशा सर्वांशी चर्चा करत शासकीय काम करायचे व ग्रामस्थांचे विचार जाणून घेवून पुढे योजना अंमलबजावणीचे काम करायचे असे स्वरूप असलेल्या या उपक्रमाला

सर्वत्र अत्यंत चांगला प्रतिसाद मिळाला. विविध शासकीय विभागांनीही उत्साहाने या उपक्रमात सहभाग घेतला. या योजनेच्या प्रायोगिक अंमलबजावणीचा आढावा घेतला असता ग्राम अधिकारी व पालक अधिकारी यांचे अनुभव अत्यंत उत्साहवर्धक असल्याचे जाणवले.त्यांच्या प्रतिक्रिया अशा आहेत की हा उपक्रम विभागात सर्वत्र राबविला पाहिजे. त्यांना आलेल्या अडचणी व त्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करून आता नाशिक विभागातील सर्वच ग्रामपंचायतीमध्ये हा उपक्रम दिनांक १ मे २००७ पासून राबविणेसाठी या सोबत सविस्तर सूचना देणेत येत आहेत.

प्रतिसादात्मक प्रशासन ही सध्याच्या काळाची गरज आहे. कारण समाज हा नेहमीच परिवर्तनशील असतो. बदलत्या परिस्थितीची आव्हाने पेलण्यासाठी प्रशासनालाही गतिमान व परिवर्तनशील बनणे क्रमप्राप्त आहे. म्हणून प्रशासन व जनता यांचेतील दुरावा कमी करून सर्व योजना व सर्व शासकीय तसेच कल्याणकारी सेवा योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणेची प्रक्रिया गतीमान करणेच्या या उपक्रमात सर्वांनीच सहभागी होण्याची गरज आहे. या पुढच्या काळात प्रत्येक विकासाच्या कामात जनसहभाग हा अनिवार्य असणार आहे.

प्रत्येक नागरिकाला लोक प्रशासनाबद्यल माहिती मिळविणेचा पूर्ण अधिकार असतो. नागरिकांना जे हवे ते पुरविल्याने प्रशासनाची कार्यक्षमता सिध्द होते आणि असे काम खुल्या व पारदर्शकपणे करणे हे उत्तम प्रशासनाचे लक्षण असते. याच सुत्रावर ग्रामस्थ दिन हा उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमाचे माध्यमातून नाशिक विभागामध्ये शासन यंत्रणा व नागरिक यांच्या परस्पर सहकार्यातून गाव विकासाची प्रक्रिया तसेच ग्राम पातळीवरील सूक्ष्म नियोजनाची प्रक्रिया निश्चितपणे वेग घेईल अशी मला खात्री वाटते.

नाशिक
दि.२१ एप्रिल २००७

डॉ.संजय चहांदे, भा.प्र.से.
विभागीय आयुक्त,
नाशिक विभाग,नाशिक